सो.रजि.नं.एम.एच.५१४/ए/एन/आर/८२,बी.पी.टी.रजि.नं.एफ/४६८ (अहमदनगर)
एन.एस.के./टेक/१२ ए. (ए)/५८/१९९४-९५

# श्री मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट निघोज

ता. पारनेर, जि. अहमदनगर
फोन :- (०२४८८) २३०९९९

(159)

जा.क.मळगंगा ट्रस्ट/५२/२०२४-२५ दि.२१/०६/२०२४

प्रति
मान.लोकनेते डॉ.श्री.निलेशजी लंके
खासदार, अहिल्यानगर दक्षिण मतदार संघ.

विषय - १) श्री क्षेत्र कुंड पर्यटन स्थळ येथील गट नं.२४१५ मध्ये वॉटरपार्क उभारणे व संरक्षण भिंत बांधकाम करणे.
२) श्री क्षेत्र कुंड पर्यटन स्थळ येथील गट नं.६७ व २४३९ ला संरक्षण भिंत बांधकाम करणे.
३) निघोज ते कुंड ४ कि.मी.रस्ता रूंदीकरण व मजबुतीकरण करणे.

महोदय,

वरील विषयान्वये विनंती अर्ज करतो की, मार्च २०११ मध्ये श्री मळगंगा देवस्थानला तिर्थक्षेत्र अंतर्गत “ ब ” वर्ग दर्जा मिळाला असून १ कोटी रूपयांचा निधी उपलब्ध होऊन कुंड येथे भक्तनिवास, स्ट्रीट लाईट, स्वच्छतागृह, पाण्याची टाकी ही कामे शासनाच्या निधीतून पुर्ण झाली आहेत. तसेच पर्यटन क्षेत्र विकास योजनेतून पाथवे, कमान, स्वच्छतागृह, पालखी मार्ग कॉक्रीटीकरण इ.कामे पुर्ण झालेली असून तिर्थक्षेत्रा प्रमाणेच कुंड येथे लक्षवेधी रांजणखळगे पर्यटकांचे लक्ष वेधून घेतात त्यामुळे येथे वर्षभर भाविकांबरोबर पर्यटकांचीही मोठया प्रमाणावर ये-जा चालू असते. महाराष्ट्रातून कुंड पाहण्याकरीता व यात्रेकरीता लाखो लोक येत असतात. याकरीता पर्यटन विकास योजनेतून सन २०२१ मध्ये पर्यटक विसावा केंद्र, भोजन हॉल, निघोज शिरूर रोड ते कुंड रोड बायपास रस्ता व सुशोभीकरण इ.कामे आपल्या मार्फत मंजुर झालेली आहेत. त्याबद्दल श्री मळगंगा ट्रस्ट व समस्त ग्रामस्थ निघोज च्या वतीने आपले हार्दीक अभिनंदन व आभार. वाढत्या भाविकांचा व पर्यटकांचा विचार करता पर्यटक व भाविकांच्या सोयीसाठी वरील कामे होणे गरजेची आहेत.

तरी आपण आपल्या स्तरावर केंद्रीय पर्यटन खात्यामार्फत योग्य तो निधी देऊन वरील कामे होण्याकरीता सहकार्य करावे ही आग्रहाची विनंती.
कळावे.

आपला विश्वासू,

श्री.शांताराम बापूराव कळसकर
सचिव
श्री मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट निघोज